# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक संपन्न**
- **पावसाळीपूर्व स्थितीचा आढावा घेताना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कामे युद्धपातळीवर पूर्ण करून घेण्याचे मा. आयुक्त यांच्या सूचना**

दिनांक 24 एप्रिल 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, प्र. अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्रमांक 01 ते 06, महापालिका अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

मान्सून दरम्यान कोणत्याही आपत्कालीन घटना यावर्षी घडू नये यासाठी आधीपासूनच आवश्यक ती दक्षता घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर द्यावा असे निर्देश देत महानगरपालिका मा. आयुक्त यांनी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी निर्देश दिले. मान्सून 2025 पावसाळापूर्व तयारीच्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांसोबत आयोजित शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीप्रसंगी समितीचे अध्यक्ष म्हणून मा. आयुक्तांनी मिरा भाईंदर शहरातील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नियोजन करावे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी असे सूचित केले.

पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी दिले. त्यांनी चालू असलेली कामे 24x7 पद्धतीने युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश दिले. कामांची गुणवत्ता अबाधित ठेवून, विशेषतः रस्ते खड्डेमुक्त ठेवण्यावर भर देण्यात यावा, मॅनहोल कव्हर्स व गटार झाकणांची तातडीने दुरुस्ती करावी, असे निर्देश त्यांनी दिले. नाल्यांजवळ साचणाऱ्या गाळाची तात्काळ विल्हेवाट लावण्याचे आणि तात्पुरत्या स्वरूपात उघड्या गटाऱ्यांची देखभाल करण्याचे आदेशही देण्यात आले. सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधकाम सुरू असलेल्या इमारतींच्या भोवती संरक्षक जाळ्या बसवणे, विजेच्या खांबांची तपासणी करून त्यांना सुरक्षित करणे, पथदिवे, सिग्नल यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, स्पीड ब्रेकर व झेब्रा क्रॉसिंगच्या रंगकामाची पूर्तता करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने महापालिका मा. आयुक्त यांनी शहरातील धोकादायक इमारतींची तातडीने तपासणी करून त्या इमारतींची यादी अंतिम करण्याचे आदेश दिले. धोका निर्माण करू शकणाऱ्या इमारतींची प्राथमिक यादी प्रभागनिहाय तयार करून त्यांचे तीन गटात वर्गीकरण (अतिधोकादायक, धोकादायक व संभाव्य धोकादायक) करावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच, या प्रभागनिहाय यादीनुसार धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यासाठी कार्यवाही तातडीने राबवावी आणि त्यासंबंधीचे नोटीस देणे, घरमालक व रहिवाश्यांशी समन्वय साधणे आणि त्यांना निवारा स्थळी स्थलांतर करण्याबाबत सुविधा पुरवणे, ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिले.

रस्त्यावरील दिवाबत्ती सुव्यवस्थित राहील व विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. याकरिता प्रत्येक विद्युत खांबाची काळजीपूर्वक पाहणी करावी असे निर्देश देण्यात आले. वाहतुक पोलीस विभागामार्फत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पावसाळी काळात सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहील याकडे लक्ष द्यावे तसेच स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारितील रस्त्यांवर करून घ्यावीत असे सूचित करण्यात आले. सर्व पथदिवे सुरु राहतील याची खबरदारी घेण्याप्रमाणेच महावितरण कंपनीने उघड्या केबल,

डिपीची झाकणे बंद असण्याची खबरदारी घ्यावी व दुरुस्ती करून घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या. तसेच एम.टी.एन.एल, एम.जी.एल. ने केलेल्या खोदाई संदर्भातील माहिती घेऊन तातडीने उर्वरित कामे पूर्ण करून घेऊन रस्ते दुरुस्ती करून घ्यावी असे निर्देश दिले.

बंदिस्त नाले व नैसर्गिक नाले यांची सफाई विहित वेळेत पूर्ण करावी असे घनकचरा व्यवस्थापन विभागास निर्देश देण्यात आले. तसेच सफाईनंतर काठाशी काढून ठेवला जाणारा गाळ थोडासा सुकल्यानंतर लगेच उचलला जावा याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, स्वच्छता आणि नालेसफाईसारखी महत्त्वाची कामे सुरक्षित पद्धतीने पार पडावीत यासाठी कंत्राटदारामार्फत काम करणाऱ्या सफाई कर्मचारी व नालेसफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक वैयक्तिक सुरक्षा साधनं जसे की हँडग्लोव्हज, मास्क व बूट यांची पूर्णपणे उपलब्धता सुनिश्चित करण्यात यावी, अशी स्पष्ट सूचना स्वच्छता निरीक्षकांना देण्यात आली. या सुविधा योग्य प्रकारे वितरित झाल्या आहेत की नाही याची नियमित तपासणी करण्याचेही आदेश देण्यात आले.

पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व तो कोणत्याही प्रकारे दूषीत होणार नाही याची काळजी घ्यावी असे सूचित करण्यात आले. तसेच आवश्यक एवढ्या ब्लिचिंग पावडरचा साठा करून ठेवणे व जल शुध्दीकरणकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मल:निसारण जलवाहिन्या आदी दुरुस्त करून त्यांची बारकाईने पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी धोकादायक इमारतींची पाहणी करून इमारतींचे वर्गीकरण करून त्यांची यादी जाहीर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सदर यादी ही आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कृती आराखड्यामध्ये प्रसिद्ध करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

पावसाळी कालावधीतील संभाव्य आजार लक्षात घेता महानगरपालिकेकडे आवश्यक औषधसाठा उपलब्ध करून ठेवणे तसेच संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि व्यापक जनजागृती करणेबाबत मा. आयुक्तांनी महत्वाच्या सूचना केल्या. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन केंद्रातील यंत्र सामुग्रीसह यंत्रणा सुसज्ज व कार्यान्वित ठेवणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील सर्व अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू करून या सर्व ठिकाणी आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे असे सूचित केले. रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्यांचे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करून, केवळ आवश्यक तेवढ्याच प्रमाणात फांद्या छाटाव्यात, असे निर्देश दिले गेले. यासोबतच, छाटलेल्या फांद्यांमुळे तयार होणारा हरित कचरा सार्वजनिक ठिकाणी साचून न राहता तत्काळ उचलण्यात यावा, यासाठी उद्यान विभाग व स्वच्छता निरीक्षकांनी परस्पर समन्वय साधावा, असे स्पष्ट निर्देश मा. आयुक्तांनी दिले.